Rambhau Mhalgi Prabodhini's
**Centre for Institution Building and Leadership Studies**

---

दिनांक : ०१ जानेवारी २०१८

## "स्वयंसेवी संस्थांसाठी - सी.एस.आर. कार्यशाळा" - अहवाल

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या "संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र" तर्फे स्वयंसेवी संस्थांसाठी - सी.एस.आर. कार्यशाळेचे आयोजन शनिवार-रविवार, दिनांक ३०-३१ डिसेंबर २०१७ रोजी पुणे येथे करण्यात आले होते.

विविध स्वयंसेवी संस्थांना सी.एस.आर.च्या माध्यमातून संस्थेच्या कार्यासाठी निधी उपलब्ध करणे, त्याची पूर्वतयारी करणे, संस्थेच्या कार्यात कंपन्यांचा निधी मिळण्यासाठी आवश्यक पात्रता, निकष आणि विविध कागदपत्रांची पूर्तता करण्यासंबंधी मार्गदर्शन करणे, तसेच या कार्यशाळेद्वारे संस्थांच्या प्रतिनिधींना त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वात आवश्यक निधी उपलब्ध करून घेता येतो हा आत्मविश्वास त्यांना देणे या उद्देशांसाठी ही दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून उद्योग क्षेत्रातील आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवी वक्ते निमंत्रित केले होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक कार्यालय अधीक्षक *श्री. राहुल टोकेकर* यांनी केले. त्यानंतर *श्री. अनिल वळसंगकर* यांनी सी.एस.आर. - पार्श्वभूमी, कायदा, गरज आणि संधी या विषयावरील चर्चासत्राने कार्यशाळेचा प्रारंभ केला. यामध्ये वक्त्यांनी विविध क्षेत्रामध्ये आलेल्या प्रकल्पांचे, कामाचे अनुभव सांगत आणि सी.एस. आर. कायद्यामध्ये समाविष्ट असलेल्या विविध मुलभूत सामाजिक समस्यांसंदर्भात उपल्ब्ध असलेल्या निधी बाबत माहिती देऊन सदर विषय विस्तृतपणे मांडला.

दुस-या सत्रामध्ये *श्री. प्रशांत महामुनी* यांनी सी.एस.आर. निधी उपलब्ध करण्यासाठी पूर्वतयारी करण्याबाबत प्रकल्प पात्रतेचे निकषांबाबत तसेच प्रकल्पाच्या स्वरूपापासून ते आपत्तीव्यवस्थापनापर्यंतच्या सर्व मुद्दयांवर मार्गदर्शन केले. आणि सी.एस.आर. निधीसाठी प्राथमिक बाबी, उदा. आपापल्या भागातील कंपन्यांचा डेटा जमा करणे व कंपन्यांकडून विचारल्या जाणा-या प्रश्नोत्तराची तयारी करणे आणि विविध शासकीय कागदपत्रांची पूर्ततेविषयी विस्तृत माहिती सांगितली.

कार्यशाळेच्या तिस-या व चौथ्या सत्रामध्ये *श्री. विवेक अत्रे* यांनी स्वयंसेवी संस्थांनी प्रकल्प प्रस्ताव लिहिण्याआधी आपल्या प्रकल्पाचा संपूर्ण अभ्यास करूनच प्रकल्प प्रस्ताव व अहवाल कसा लिहावा? त्याचे स्वरूप कसे असावे? प्रकल्पाची, त्याच्या कार्यवाहीची माहिती प्रस्तावामध्ये कशा पद्धतीने लिहावी? त्याचबरोबर प्रकल्प शाश्वतता म्हणजे काय? आणि प्रकल्पाचा आत्मा म्हणजे प्रकल्पाचे अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्याचे बारकावे सांगून संस्थेच्या प्रकल्पाचा खर्च आणि संस्थेचा प्रशासकीय खर्च यातील फरक समजणे किती आवश्यक आहे जेणे करून अंदाजपत्रकामध्ये पारदर्शकता कशी राहील याची माहिती देत विविध क्षेत्रातील उदाहरणांसह प्रकल्प प्रस्ताव लेखन हा विषय सोपा करून सांगितला. त्याचबरोबर प्रकल्पाचा Activity Chart तयार करण्याची पद्धत सांगत प्रकल्प प्रस्तावातील सर्व बारकावे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेच्या दुस-या दिवशी सर्व सहभागींचे काही गट तयार करण्यात आले. प्रत्येक गटाला वेगवेगळ्या सामाजिक विषयावरील प्रकल्प प्रस्ताव लिहिण्यास सांगितला. त्याआधी प्रकल्प प्रस्ताव लेखनाचे स्वरूप सांगितले होते, त्यानुसार प्रत्येक गटाने सांघिकरित्या आपापल्या प्रकल्प प्रस्तावातील केवळ महत्वाचे मुद्दे लिहिले. त्यानंतर प्रत्येक गटांद्वारे लिहिलेल्या प्रस्तावाचे सहभागींसमोर सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक गटाच्या सादरीकरणानंतर वक्त्यांनी प्रस्तावातील आवश्यक बदल सुचवून त्याचे स्पष्टीकरणही दिले. तसेच प्रस्ताव लेखनात होणा-या चुकांकडे लक्ष वेधून घेतले. या सत्रासाठी *श्री. शैलेश घाटपांडे* यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. अशाप्रकारे

प्रकल्प प्रस्ताव लेखनाचा सराव सहभागींकडून करवून घेतला. या कृतीसरावामुळे सहभागींना ते स्वत: प्रकल्प प्रस्ताव लिहू शकतात हा आत्मविश्वास त्यांना आला.

कार्यशाळेच्या तिस-या सत्रामध्ये *सौ. योगिता आपटे* यांनी प्रकल्प संनियंत्रण, मूल्यमापन, संस्थांच्या विविध प्रकल्पांचा प्रकल्प क्षेत्रावर आणि लाभार्थ्यांवर प्रत्यक्ष कसा व किती परिणाम झाला अथवा होत आहे याबद्दलचे मूल्यमापन कसे करावे? या विषयी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. यानंतरच्या सत्रामध्ये संस्था आणि उद्योग किंवा कंपनी यांच्यामधील समन्वय कसा साधावा? या दोघांमध्ये सहकार्याची दिशा कशी असावी? कंपनीला संस्थेने सी.एस.आर. निधी प्राप्त करण्यासाठी प्रकल्प व त्याची गरज याची माहिती कशी द्यावी? याबाबत विविध कंपन्यांचे व स्वयंसेवी संस्थांच्या प्रकल्पांबाबत अनुभव सांगत वक्त्यांनी सर्व सहभागींच्या प्रकल्प मूल्यमापनासंबंधी असलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

सी.एस.आर. साठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, प्रकल्प प्रस्ताव व अहवाल लेखन, प्रकल्प मूल्यमापन आणि कंपन्यांबरोबरचा समन्वय या व अशा अनेक क्लिष्ट वाटणा-या विषयांची विस्तृत माहिती या कार्यशाळेमध्ये सर्व सहभागींना मिळाली. “आता आम्ही प्रकल्प प्रस्ताव लिहू शकतो, यावर आमचा विश्वासच बसत नाही”, प्रस्ताव लिहिताना सहज होणा-या चुका कशा टाळाव्यात या संबधी बारकावे कळाले” सहभागींनी अभिप्रायामध्ये दिलेल्या या काही बोलक्या प्रतिक्रिया आहेत.

कार्यशाळेमध्ये निमंत्रित केलेल्या सर्व अनुभवी वक्त्यांनी सहभागात्मक, सहभागींच्या नेमक्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्या समजण्याच्या पातळीवर जाऊन चर्चा करून, केसस्टडीद्वारे आपापल्या विषयाची मांडणी केली.

या कार्यशाळेला रायगड, बीड, अकोला, औरंगाबाद, नाशिक, उस्मानाबाद, अहमदनगर, सोलापूर, पुणे, सांगली, यवतमाळ, नागपूर, वर्धा, अमरावती, नांदेड, सिंधुदूर्ग, मुंबई, परभणी आणि ठाणे जिल्ह्यातील विविध स्वयंसेवी, सामाजिक तसेच शैक्षणिक संस्थांचे एकूण ४३ प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या शेवटी सर्व प्रतिनिधींना सहभागाबद्दल रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतिने प्रमाणपत्राचे वितरण वक्त्या *सौ. योगिता आपटे* यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेचा समारोप कार्यालय अधीक्षक *श्री. राहुल टोकेकर* यांनी केला.

राहुल टोकेकर
कार्यालय अधीक्षक
रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र, पुणे